दैनिक मुक्तागिरि

३ दैनिक मुक्तागिरि सातारा ■ मंगळवार, दि. २१ डिसेंबर २०२१ www.emuktagiri.in संमिश्र

# आपल्यातल्या आठ प्रकारच्या बुद्धिमत्तेला संधी मिळायला हवी

## डॉ. अनिल पाटील यांचे प्रतिपादन : छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्साहात

सातारा : "आज आपण दोन वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर समोर आलो आहोत. छत्रपती शिवाजी कॉलेज हे रयत शिक्षण संस्थेचे पहिले कॉलेज असून कर्मवीरांनी ग्रामीण मुलांसाठी वेगळा विचार केला.आज रयत शिक्षण संस्थेची एक युनिव्हर्सिटी उभी राहत आहे.तुम्ही भाग्यवान आहात कारण तुम्हाला आधुनिक शिक्षणाच्या सुविधा मिळाल्या. डॉ.जयंत नारळीकर म्हणतात की आठ प्रकारच्या बुद्धीमता आपल्याला मिळाल्या आहेत. पण आपण आजच्या शिक्षणात केवळ स्मरणात ठेवण्याची बुद्धिमता वापरतो आहोत. आपल्याला जे हवे ते शिक्षण देण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.विद्यार्थ्यांना विज्ञान व तंत्रज्ञान यांचे जग मिळाले आहे.ई बुक,ब्लॉग,इत्यादींचा वापर करून आपली कला ,कौशल्ये जगात घेऊन जाण्याची संधी आपल्याला मिळाली आहे आपल्यातल्या आठ प्रकारच्या बुद्धिमत्तेला संधी मिळायला पाहिजे असे मत रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ.अनिल पाटील यांनी व्यक्त केले. ते शिवाजी विद्यापीठाच्या ४१ व्या सातारा जिल्हा स्तरीय युवा महोत्सवाचे उद्घाटन करताना बोलत होते. अध्यक्ष स्थानी रयत शिक्षण संस्थेचे ऑडीटर प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे हे उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सव समितीचे सचिव डॉ. आर.व्ही.गुरव,महाविद्यालयाचे प्राचार्यडॉ.विठ्ठल शिवणकर,सातारा जिल्ह्याचे सांस्कृतिक विभाग समन्वयक डॉ.सो.यु.माने, युवा महोत्सव समिती सदस्य प्राचार्य डॉ.वाय.बी.गोंडे,मा प्राचार्य डॉ. एल.जी.जाधव,प्राचार्य डॉ.वंदना जाधव.इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती. सातारा जिल्ह्यातून ३१ महाविद्यालयाचे कलावंत विद्यार्थी विद्यार्थिनी,प्राध्यापक सहभागी झाले होते.

प्रास्ताविकात शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सव समितीचे सचिव व विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ.आर .व्ही. गुरव म्हणाले की२ वर्षे कोरोनाच्या छायेखाली आपण राहिलो,त्यानंतर पावसाळ्यात महापुराची परिस्थिती होती.युवा महोत्सव झाला पाहिजे



ही तीव्र इच्छा विद्यार्थ्यांची असते .विद्यापीठाच्या टीम मध्ये निवड होण्याची इच्छा असते.मा. त्यामुळेच कोरोना काळात कुलगुरूच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाईन महोत्सव आपण घेतला. तंत्रज्ञानाचा वापर करून आम्ही महोत्सव घेतला.मुलांचे कलागुण पाहण्याचे भाग्य पालकांना लाभले.त्यावेळी तिन्ही जिल्ह्यातून १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थी घरी असले तरी त्यांचे कला गुण उर्जा फुलवत ठेवण्याचा प्रयत्नआम्ही केला. ऑफलाईन पद्धतीने हा युवा महोत्सव घेण्याचे आम्ही धाडस केले.यावर्षी सातारा जिल्ह्यातून ३१ कॉलेज ,सांगली जिल्ह्यात ४० महाविद्यालये ,कोल्हापूर जिल्ह्यातून ५२ कॉलेज सहभागी झालेत.परीक्षकाचे अचूक परीक्षण होत असल्याने कोणताही अनुचित प्रकार आजवर घडला नाही.विद्यार्थ्यांनी आपले कला गुण मुक्तपणे सादर करावेत असे ते म्हणाले

अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे म्हणाले की विद्यापीठाच्या अभ्यासक्रमा बरोबरच सर्वांगीण विकासासाठी कलेचा विकास देखील आवश्यक आहे.सुप्त कलागुणांचा शोध घेऊन त्यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे.नृत्य अभिनयाची कौशल्ये विकसित होणे आवश्यक आहे.असे मत त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमात प्रारंभी कर्मवीर प्रतिमेस अभिवादन करून दीप प्रज्वलन झाले. सर्वांचे स्वागतव प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. रोशनआरा शेख यांनी केले. परिचय उपप्राचार्य डॉ.रामराजे माने देशमुख यांनी करून दिला. आभार डॉ.अनिलकुमार वावरे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा.गजानन चव्हाण व प्रा.साधना पाटील यांनी मानले.